# ''सुभद्रा देवी शर्मा (एस.डी.एस.) फाऊंडेशन''

**मुख्य कार्यालय :** श्री. पंकज कैलास शर्मा
फ्लॅट नं. ए-१२०१, प्लॉट नं. १५ ते १७,
सेक्टर-७, घणसोली-४०० ७०१.
या न्यासाचे विश्वस्त व्यवस्थापत्र

व्यवसाय – धंदा वय-४० वर्ष

प्रथम पक्षीय
विश्वस्त व्यवस्था
पत्रकर्ता लेहून देणार

राहणार : फ्लॅट नं. ए-१२०१, प्लॉट नं. १५ ते १७,
सेक्टर-७, घणसोली-४०० ७०१.

949 2013
E-8193/T
21-6-2013


Scanned with CamScanner

| क्र. | नाव | पत्ता | वय | व्यवसाय | हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. पंकज कैलास शर्मा** | फ्लॅट नं. ए-१२०१, प्लॉट नं. १५ ते १७, सेक्टर-७, घणसोली-४०० ७०१. | ४० | धंदा | अध्यक्ष |
| २ | **श्री. संतोष जगत शर्मा** | बी-५०२, रिद्धी सिद्धी अपार्टमेंट, श्री पुनित डेव्हलपर्स, प्लॉट नं. ६१-सी, सेक्टर-२१, खारघर, नवी मुंबई-४१० २१०. | ४० | धंदा | उपाध्यक्ष |
| ३ | **श्री. भारत रतीलाल ठक्कर** | बी-७०२, रामकुटीर बी/सी विंग, जंगलेश्वर मंदिर रोड, असल्फा व्हिलेज, एकविरा सर्वे नगर जवळ, घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८४. | ३८ | धंदा | सचिव |
| ४ | **सौ. अजिता पंकज शर्मा** | फ्लॅट नं. ए-१२०१, प्लॉट नं. १५ ते १७, सेक्टर-७, घणसोली-४०० ७०१. | ३३ | नोकरी | खजिनदार |

या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था पत्राबाबतचा करार प्रथम पक्षीय विश्वस्त व्यवस्था पत्रकर्ता (सेटलॉर) व द्वितीय पक्षिय विश्वस्त यांचेमध्ये दि...१/५/२०१३.. रोजी **फ्लॅट नं. ए-१२०१, प्लॉट नं. १५ ते १७, सेक्टर-७, घणसोली-४०० ७०१.** येथे करण्यात आला.

ज्या अर्थी, प्रथम पक्षिय विश्वस्त व्यवस्थापनकर्ता यांची इच्छा या विश्वस्त पत्रामधअये नमूद केलेले हेतु, उद्दिष्टांसाठी सार्वजनिक न्यास निर्माण करण्याचा आहे व त्यासाठी न्यास निर्मात्यांच्या मालकी हक्कांचे रोख रु. १,०००/- (रुपये एक हजार मात्र) विश्वस्त निधी म्हणून खालील नमुद केलेल्या करारातील तरतुदीनुसार द्वितीय पक्षिय विश्वस्तांचे हवाली केलेले आहेत. ज्या अर्थी द्वितीय पक्षिय या विश्वस्त व्यवस्थापत्रात तरतुदीनुसार विनियोग करण्यासाठी न्यासाचे प्रथम विश्वस्त म्हणुन रहावयास तयार आहेत व हा दस्तऐवज करतांना रोख रु. १०००/- (रुपये एक हजार मात्र) द्वितीय पक्षीय विश्वस्तांचे कब्जात दिल्याची त्यांनी पोहोच पावती दिलेली आहे आणि ज्या अर्थी प्रथम पक्षिय विश्वस्त न्यासनिर्माता हे द्वितीय पक्षिय विश्वस्त यांचेशी करार करीत आहेत. त्याअर्थी सदरच्या विश्वस्त व्यवस्थापत्रातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

Ajita Sharma



Scanned with CamScanner

**विश्वस्त व्यवस्थेचे नाव कार्यालय :**

या विश्वस्त व्यवस्था पत्रात निर्माण करण्यात आलेला सार्वजनिक न्यास

**''सुभद्रा देवी शर्मा (एस.डी.एस.) फाऊंडेशन''** या नावाने संबोधण्यात येईल. या न्यासाचे मुख्य **कार्यालय : फ्लॅट नं. ए-१२०१, प्लॉट नं. ११ ते १७, सेक्टर-७, घणसोली-४०० ७०१.** . असा असेल.न्यासाची स्वंत्र स्थावर मिळकत निर्माण झाल्यास कार्यालय तेथे हलविण्यात येईल. त्याबाबत ठाणे जिल्ह्याच्या हद्दीत कार्यालय हलविण्याचा अधिकार विद्यमान कार्यशिल विश्वस्तांना असेल व वेळोवेळी असा बदल मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांना कळविण्यात येईल.

१) **कार्यक्षेत्र :**

या न्यासाचे कार्यक्षेत्र संपुर्ण भारतभर असेल.

२) **न्यासाचे उद्देश :**

१) परिसरातील व्यक्तींचा सामाजिक, शैक्षणिक, बौध्दीकदृष्ट्या विकास करणे.

२) या न्यासातर्फे पुजा अर्चना करणे व भारतीय संस्कृति जपणे व त्याचा आदर करणे.

३) या स्त्रियांना बचतगटाचे महत्त्व पटवुन देणे.

४) या न्यासातर्फे गनेश उत्सव, श्री सत्यनारायण पुजा, दिवाळी, दसरा, होळी, भाविकांना महाप्रसादाचे वाटप करणे, मंदिरासाठी जागा उपलब्ध करणे, मंदिर बांधणे, मंदिराची देखरेख करणे, भजन-किर्तन इत्यादी भारतीय संस्कृतीला जपणारे कार्यक्रम राबविले जातील. समाजा उपयोगी कार्य करणे.

५) या न्यासामार्फत विभागातील सर्व संबंधीतांना एकत्रित आणुन त्यांच्यात बंधुत्व, एकता, राष्ट्रप्रेम निर्माण करण्याकरिता कार्यक्रम राबविण तसेच या न्यासामार्फत परिसरात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, बौद्धिक, धार्मिक दृष्टया विकास करणे.

६) न्यासामार्फत विविध सण साजरे करणे जसे, धार्मिक सन तसेच १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, थोर पुरुषांच्या जयंत्या व इतर धार्मिक उत्सव साजरे करणे. त्यानिमित्ताने धर्मदाय स्वरुपाचे कार्यक्रमआयोजित करणे. भविष्यात धर्मदाय

Ajita Sharma



Scanned with CamScanner

स्वरुपाचे सेवाकेंद्रे स्थापन करणे. त्या निमित्ताने नाटक, एकांकिका, डान्स मुलांकडून वटवून घेऊन त्यांच्या कलागुणांचा विकास करणे.

७) न्यासामार्फत परिसरातील गरीब व गरजू मुलां-मुलींकरीता अंगणवाडी, बालवाडी मार्गदर्शन केंद्रे, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक विद्यालय, महाविद्यालय, मेडिकल महाविद्यालय, डी.एड. बी.एड्. महाविद्यालय, तांत्रिक विद्यालय, कलाकेंद्रे, संगणक प्रशिक्षण देणे, तंत्रनिकेतन असे विविध शैक्षणिक उपक्रम चालविणे.

८) शैक्षणिक दृष्टया उन्नतीसाठी सार्वजनिक वाचनालय, अभ्यासक्रम केंद्रे, ग्रंथालय, कल्याण केंद्र व संगीतालय इ. स्थापन करणे, चालविणे, कार्यशाळा निर्माण करणे.

९) न्यासामार्फत मुलांच्या व महिलांच्या विकासाच्या दृष्टीने विविध योजनांचे मार्गदर्शन करणे, निरनिराळ्या व्यवसायांचे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याच्या सुविधा उपलब्ध करुन देणे.

१०) न्यासामार्फत शिक्षणापासुन वंचित असणाऱ्या शिक्षणाचे महत्व पटवुन देण्यासाठी अल्पसंख्यांक भागात शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करणे.

११) न्यासामार्फत गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी शिष्यवृत्ती, वह्या, पुस्तके, लेखन सामग्री, गणवेश वगैरे देऊन शैक्षणिक दृष्टया गरीब विद्यार्थ्यांना योग्य ती मदत करणे. हुशार विद्यार्थ्यांचा सत्कार करणे व त्यांना शैक्षणिक व वैद्यकिय मदत करणे.

१२) न्यासामार्फत भारतातील कोणत्याही राज्यात, जिल्ह्यात, गावात, शहरात विविध सांस्कृतिक, वैद्यकिय व शैक्षणिक कार्यक्रम आखणे व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.

१३) शिक्षण, कला, क्रिडा, साहित्य यांची जोपासना व प्रसार करणे.

१४) न्यासामार्फत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिर, नेत्र चिकित्सा शिबीर, तसेच वृक्षरोपण आदी योजनांचा पाठपुरावा करणे. शिबीर आयोजित करणे, तसेच रुग्णांपर्यंत औषधे व वैद्यकीय मदत पोहचविण्याचे प्रयत्न करणे. धर्मादाय स्वरुपाचे दवाखाने स्थापन करणे, मेडिकल कॅम्प भरविणे, रुग्णवाहिका सेवा पुरविणे इत्यादी

१५) न्यासामार्फत बाल आश्रम, महिलाश्रम, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, बालसंगोपनकेंद्रे, सैनिक शाळा, वसतीगृहे, मुकबधीर, अपंग शाळा, वेदशाळा, गोशाळा, योगशाळा,

Ajita Sharma Bharat Santosh C.



Scanned with CamScanner

तत्वज्ञान पीठ यांची स्थापना करणे व प्रशिक्षण देणे. भाल संस्कार केंद्र, ध्यानकेंद्र, योगसाधना केंद्र, धर्मशाळा स्थापन करणे.

१६) या न्यासामार्फत तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण होण्यासाठी निरनिराळ्या खेळांची शिबिरे आयोजित करणे, विविध क्रिडा स्पर्धा आयोजित करणे व त्यामध्ये विजयी झालेल्या खेळाडूंचा यथोचित गौरव करणे व त्यांना प्रोत्साहन देणे, व्यायामशाळा, जलतरंग स्थापन करणे, चालविणे.

१७) समाजातील जुनी साहित्यीक व सांस्कृतिक स्वरुपाचे काम करणाऱ्या व निस्वार्थपणे काम करणाऱ्या लोकांचा सन्मान करुन त्यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहचविणे.

१८) समाजात सन्मानित जीवन जगण्यासाठी उपेक्षित महिलांना, विधवाना आणि मुलांना मदत करणे, नैसर्गिक आपदाग्रस्त लोकांची मदत करणे.

१९) व्यसनमुक्त व अंधश्रद्धा मुक्त समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करणे.

२०) परिसरातील बेरोजगार तरुणांना विविध योजना, व्यवसायाबद्दल माहिती देऊन त्यांना रोजगार मिळविण्याचे प्रशिक्षण देणे.

२१) न्यासामार्फत वनिकरणाचे कार्यक्रम करणे, प्रदुषणमुक्त वातावरण निर्मितीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन जनजागृति करणे. पर्यावरण समतोल राखण्यासाठी जनजागृती करणे व वृक्ष लागवड व वृक्ष दिंडी काढणे असे जनहिताचे उपक्रम राबविणे.

२२) वृक्षरोपन, स्वच्छता मोहिम, आरोग्य विषयक श्रमदानातुन सेवा, शेतीविषयक ज्ञान, कृतक्ष उत्पादन हे करुन दाखविणे, रोजगारांना बेकारांना वार मिळवुन देणे.

**३) विश्वस्त मंडळ :-**

न्यासाचे उद्देश पार पाडण्यासाठी व विश्वस्त व्यवस्थेची व्यवस्था नियमीत व सुव्यवस्थीत चालविण्यासाठी खालील व्यक्तींची न्यासाचे प्रथम विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी त्यास मान्यता दिली आहे.

Ajita Sharma



Scanned with CamScanner

| क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. पंकज कैलास शर्मा | अध्यक्ष |
| २ | श्री. संतोष जगत शर्मा | उपाध्यक्ष |
| ३ | श्री. भारत रतीलाल ठक्कर | सचिव |
| ४ | सौ. अजिता पंकज शर्मा | खजिनदार |

**४) विश्वस्तांची संख्या :-**

न्यासाचे विश्वस्त मंडळात कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ११ विश्वस्त असतील. न्यासाचे प्रथम विश्वस्त मंडळ ३ जणांचे असेल. वरील सर्व विश्वस्त कायमस्वरुपी राहतील.

**५. विश्वस्तमंडळ व रिक्त पदे भरण्याची पद्धत :-**

या न्यासामध्ये प्रथम सर्व विश्वस्त ह्यात असेपर्यंत विश्वस्त म्हणून पदावर राहतील व भविष्यात विविध कारणांनी रिक्त होणाऱ्या पदावर बहुमताने विश्वस्तांची नियुक्ती / नेमणुक केली जाईल.

तसेच प्रमुख विश्वस्त यांना विश्वस्त कमी करण्याचा व वाढविण्याचा अधिकार असेल.

**६. विश्वस्त पद रद्द करणे / किंवा पदाधिकारी बदलणे :-**

१. राजीनामा दिला असेल किंवा मृत्यु पावला असेल तर विश्वस्त पद रद्द करता येईल.

२. न्यासाच्या नियमाविरुद्ध, उद्देशाविरुद्ध किंवा हिताविरुद्ध वर्तन असेल तर विश्वस्त पद रद्द करता येईल.

३. मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा १९५० चे कायद्यान्वये गुन्ह्यास पात्र असेल तर त्याचे विश्वस्त पद रद्द करता येईल

४. फौजदारी गुन्ह्यास शिक्षा झालेली असेल किंवा दंड झालेला असेल तो नियमानुसार रु. ५०/- पेक्षा जास्त असेल तर विश्वस्त पद रद्द करता येईल.

५. पुर्व सुचना न देता सतत ३ सभांना गैरहजर राहिला तर विश्वस्त पद रद्द करता येईल.

Ajita Sharma



Scanned with CamScanner

६. न्यासाच्या विश्वस्तांपैकी एखाद्या अकार्यक्षम विश्वस्ताला कमी करण्याचा ठराव बहुमताने मंजुर केल्यास त्याचे विश्वस्तपद रद्द होईल.

७ **विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये :-**

**प्रमुख विश्वस्त (अध्यक्ष)** : विश्वस्त मंडळाच्या सभेचे सभापतीस्थान स्विकारणे, नोटीस काढु विश्वस्त मंडळाची सभी आयोजिक करणे, त्या सभेते ते पदसिद्ध सभापती असतील. विश्वस्त मंडळाच्या सभेचा अजेंडा त्यांचे स्वाक्षरीने निघेल व ते सभ्च्या इतिवृत्तांवर स्वाक्षरी करतील. न्यासाने सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार व रकमेची देवणघेवाण करतील व त्यावर लक्ष ठेवतील. न्यासाचे नोकर चाकरांचे कामावर लक्ष ठेवणे व कामे करुन घेणे. ट्रस्टच्या हिताची दैनंदिन व इतर कामे करणे. न्यासाच्या स्थावर जंगम मालमत्तेवर देखरेख ठेवणे.

**विश्वस्त सचिव :** अध्यक्षांच्या परवानगीने विश्वस्त मंडळाच्या सर्व सभा बोलविणे, न्यासाची कायदेशिर सर्व कागदपत्रे हाताळणे, सभेचा अजेंडा तयार करणे, सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार व रकमेची देवाण-घेवाण करणे, सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार व रकमेची देवाण-घेवाण करणे, ताळेबंदाच्या रिपोर्ट आल्यावर मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ठाणे यांच्याकडे पाठविणे, रोजकिर्द ठेवणे, देणगी देणाऱ्यांना पावती देणे, आवश्यक निधी बाबत चर्चा घडवून आणणे, न्यासाच्या मालमत्तेवर देखरेख ठेवणे.

**विश्वस्त खजिनदार** : अध्यक्ष व विश्वस्तांच्या संमतीने न्यासाचे हिशोब ठेवणे, आर्थिक व्यवहार हाताळणे, रकमेची देवाण घेवाण करणे, वार्षिक ताळेबंद तयार करुन तो चार्टर्ड अकाऊंटन कडे पाठविणे, न्यासाच्या हिशोबी संबंधी जमा खर्चाच्या वह्या ठेवणे.

**विश्वस्त/सदस्य :-** अध्यक्षांचे मार्गदर्शनाखाली व त्यांचे सुचनेप्रमाणे कामे करणे, विश्वस्त न्यायाचे सर्व सभासदांना विशेष सभा व मागणी सभांना हजर राहणे, विश्वस्त न्यासाच्या न्यासाचे कारभार मदत करणे.

८ **न्यासाचे विश्वस्तांचे अधिकार :-**

१) न्यासाच्या कारभारासाठी व मिळकतीची देखरेख ठेवणे.

२) न्यासाचे सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे.

Ajita Sharma

३) विश्वस्त मंडळाचे व न्यासाच्या विश्वस्तांनी बहुमताने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणे, न्यासाच्या सेवकवर्गाची नेमणुक करणे, त्यांची रजा मंजुर करणे, त्यांना काढुन टाकणे, एखाद्या कार्याकरीता उपसमिती नेमणे, कार्यसमाप्तीनंतर उपसमिती रद्द करणे, किरकोळ नियम तयार करणे, आवश्यकतेनुसार नियमात बदल करणे.

४) न्यासाचे जमाखर्च सनदी लेखापालाकडुन तपासुन घेणे, अंदाजपत्रक मंजुर करणे.

५) न्यासाची स्थावर व जंगम मालमत्ता यामध्ये वाढ-घट करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाला असेल.

**९ विश्वस्त न्यासाची सभा व तातडीची सभा :-**

विश्वस्त न्यासाच्या दर तीन महिन्यांनी एक अशा वर्षातुन ४ सभा घेण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास आणखी विश्वस्त न्यासाची सभा बोलविता येईल. विश्वस्त न्यासाचे विश्वस्तापैकी ३/५ सभासदांनी सबब कारणासह लेखी अर्ज अध्यक्षांकडे दिल्यास आपल्या अधिकारात तातडीची मागणी सभा बोलवतील. लेखी अर्ज दिल्यावर अध्यक्षांनी ७ दिवसाचे आत सभा न बोलविल्यास लेखी अर्ज देणारे आपल्या अधिकारात सभा बोलावतील. सदर सभेत ३/५ विश्वस्त हजर असणे आवश्यक आहे. कारण सभेत सर्व प्रकरणी बहुमताने निर्णय घेतला जाईल. अशी सभा ट्रस्टच्या जागेत घेणे उचित ठरेल.

**१० विश्वस्त न्यासाचे सभेची सुचना व गणसंख्या :-**

विश्वस्त न्यासाची सभेची सुचना ७ दिवस अगोदर देणे आवश्यक आहे. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, स्थळ, सभेचे विषय नमुद करणे आवश्यक आहे. सुचना डाकबुकात सही घेऊन अथवा रजि. ॲडी टपालाद्वारे पाठविता येईल. सभेची लेखी सुचना दिल्यावर सर्व विश्वस्त सभासदांनी संबंधीतम सभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. विश्वस्त मंडळाचे ३/५ विश्वस्त उपस्थित

Ajita Sharma

Scanned with CamScanner

झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यात येईल. परंतु अशी गणसंख्येअभावी कोणतीही सभा तहकुब झाल्यास अर्धा तास वाट पाहुन त्याच ठिकाणी त्याच दिवशी त्याच विषयावर पुन्हा सभेचे कामकाज सुरु केले जाईल. अशा सभेला गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. परंतु अशी टीप सुचनेमध्ये असणे आवश्यक आहे.

**११ बहुमताचा ठराव :-**

विश्वस्तांचे सभेत येणाऱ्या विषयांवर बहुमताने निर्णय घेतले जातील. प्रत्येक विश्वतांना एकाट मताचा अधिकार असेल. त्यावेळेस ठरावाच्या बाजुने व विरुद्ध समसमान मते पडतील अशा वेळेस अध्यक्षांना एक जादा मत देण्याचा अधिकार असेल. त्यावेळेस जो निर्णय होईल त्यास अंतिम मान्यता देण्यात येईल.

**१२ सभा वृत्तांत वही :-**

विश्वस्तांचे सभेची आणि कामकाजाची एक स्वतंत्र सभा वृत्तांत वही ठेवण्यात येईल. अशा वृत्तांत वहीत अजेंड्याप्रमाणे विश्वस्तांचे सभेत होणाऱ्या ठरावाची स्पष्टपणे नोंद घेतली जाईल. सभा वृत्तांत वहीत घेण्यात ठराव पुढील सभेत मंजुर करुन घेण्याची जबाबदारी विश्वस्त मंडळाची असेल व अशा मंजुर इतिवृत्तांवर कार्याध्यक्ष आपली सही करतील. सभेत मतभेद निर्माण झाल्यास तसा उल्लेख ठराव मंजुर करतांना इतिवृत्तांत केला जाईल. सर्व मंजूर ठरावाच्या प्रती सर्व विश्वस्तांना देण्यात याव्यात व सर्व मंजूर ठराव विश्वस्तांना लागू राहील.

**१३ बँक खाते :-**

न्यासाचा सर्व पैसा, निधी, देणगी, अनुदान स्थावर व जंगम मालमत्ता या मिळकतीपासून मिळणारे उत्पन्न तसेच इतर मार्गांनी येणाऱ्या सर्व रकमा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा १९५० चे कलम ३५ मधील तरतुदीप्रमाणे बँकेत जमा करावयाच्या आहेत.

Ajita Sharma

Scanned with CamScanner

कोणत्याही राष्ट्रीयत्व किंवा शासनमान्यता अधिकृत बँकेत न्यासाचे नावे खाते ठेवण्यात येईल. तसेच बँक व्यवहारासाठी मुख्य विश्वस्तांच्या सहीने बँकेचे देवाण घेवाणाचे व्यवहार करण्यात येईल. बँक खाते अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांचे संयुक्त नावे असेल. शदर खात्यामधून रक्कम काढतना अध्यक्ष, सचिव व खजिनदार या तिघांपैकी दोघांच्या सह्या आवश्यक असतील.

**१५. हिशोब वर्ष :-**

न्यासाचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असेल.

**१६. स्थावर व जंगम मालमत्ता रजिस्टर :-**

विश्वस्तांना न्यासाचे मालमत्ता विकणे, गहाण ठेवणे, अदलाबदल करणे, हस्तांतरण करणे, करारावर देणे, भाडेपट्टयाने देने, कर्जाऊ गुंतवणूक करणे असे व्यवहार करता येईल. परंतु त्यासाठी सर्व विश्वस्तांची विश्वस्त मंडळाचे सभेत परवानगी घ्यावी लागेल. तसेच मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा १९५० चे कलम ३५ व ३६ प्रमाण पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. या विश्वस्त व्यवस्था अधिनियन १९५० व आयकर अधिनियम १९६१ अन्वये रोख्यात विद्यमान विश्वस्तांना असेल, त्यासाठी करावे लागणारे दिलेले दस्तऐवज करारनामे किंवा संविदा करण्याचा पुर्णाधिकार विद्यमान विश्वस्तांना असेल. उपरोक्त व्यवहार हा सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा १९५० चे अधिन राहुन करण्यात येईल.

**१७. न्यासाची मिळकत :-**

न्यासाचे मिळकतीमध्ये स्थावर व जंगम अशा सर्व मिळकतीचा समावेश राहिल. बक्षिस पत्राने वा खरेदी केलेल्या अशा सर्व मिळकती न्यासाच्या मिळकती म्हणून संबोधिल्या जातील. तसेच ट्रस्टचे नावे मिळणाऱ्या देणग्या, भेट, गुप्तदान व वस्तुरुपाने मिळणाऱ्या देणग्या यासर्व बाबींचा न्यासाचे

Ajita Sharma

Scanned with CamScanner

रकमेतुन स्थावर व जंगम मालमत्ता ट्रस्टच्या नावे खरेदी करता येईल. व खरेदी व्यवहाराला संपूर्ण विश्वस्त मंडळ कायदेशीर जबाबदार राहिल. एखाद्या विश्वस्ताने विश्वस्त निधीचा गैरवापर केल्याचे उघड झाल्यास अशा विश्वस्तांविरुद्ध कायदेशीर खटला उभारला जाईल व होणारा खर्च न्यासातुन करण्यात येईल. विश्वस्तांचे ताब्यात सर्व मिळकती. असतील. विश्वस्तांचे त्यांचे कायदेशिर मुदतीत इतरांना हस्तक्षेप करण्याचा कोणताच अधिकार नाही. न्यासाच्या मिळकतीची देखभाल व दुरुस्ती करतील. विश्वस्त मंडळ ठरविल त्याप्रमणे न्यासाला जिर्णोद्धार फंड, इमारत फंड इ. फंड निर्माण करता येईल. भारतात प्रचलित असलेल्या आयकर अधिनियम आणि १९६१ मध्ये सांगितलेल्या तरतुदीप्रमाणे किंवा भारताता प्रचलित असलेल्या आयकर अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेल्या निममामध्ये होणाऱ्या संबंधीत प्रयोजनावर निर्बंध घालण्याचा तसेच त्याबाबत विनिमय करण्याचा अधिकार राहिल. भारतात आयकर नियमसंबंधी असलेल्या शर्ती, देणग्या, पैसा, निधी, बक्षीसपत्रे व इतर तत्सम कायदेशीर रक्कम वरील भरवायास लागणाऱ्या आयकराबाबत आयकर अधिनियम १९६१ मध्ये तरतुद करुन ठेवल्याप्रमाणे सहाय्य, सुट, तुटक सवलत मिळेल.

**१८ खर्चाबाबत तरतुद :-**

न्यासाला मिळणारे स्थावर मिळकतीचे उत्पन्न, देणगी, अनुदान, इमारतीचे भाडे, इतर मार्गाने येणाऱ्या उत्पन्नातुन नोकर वर्गाचा पगार, लाईट बिल, डागडुगी, ग्रामपंचायत कर, नगरपालिका कर, शेतसारा इतर कायदेशीर बाबींचा खर्च हा जमा होणाऱ्या उत्पन्नातुन केला जाईल. खर्च वजा करुन जी रक्कम शिल्लक राहिल. ती इतर उद्देशाकरता खर्च केली जाईल. या विश्वस्त सदर सार्वजनिक ट्रस्ट वैद्यकीय, सामाजिक, धर्मदाय स्वरुपाची असल्याने व विश्वस्त व्यवस्था पत्रात काहीही अंतर्भूत असेल तरी विश्वस्तांना योग्य वाटेल तसा समायोजन अनुवांशिक

Ajita Sharma



Scanned with CamScanner

कालप्राप्त करण्यासाठी भारतीय न्यास अधिनियम १८८२, इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१, गिफ्ट ॲक्ट १९५८, वेल्थ ॲक्ट १९५७ व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अन्य कायद्याच्या सवलतींचा फायदा अथवा उपबंधानुसार मिळणाऱ्या सवलतीनुसार योग्य ती उपाय योजना कार्यकृती, कार्यवाही करण्याचा अधिकार विश्वस्तांना राहिल याची साक्ष म्हणुन विश्वस्तपत्रात नमुद केलेल्या तारखेस सही केली आहे. पत्राला अनुसरुन वरील विश्वस्त निधीतून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाच्या रकमेतुन शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक, सांस्कृतिक उद्देशासाठी येणारा खर्च विद्यमान विश्वस्त आपल्या अबाधित असलेल्या अधिकारात करु शकतील.

**१९. न्यासाची मिळकतीची दुरुस्ती :-**

१) न्यासाकडे जरुर तो निधी, दुरुस्तीसाठी उपलब्ध नसल्यास विश्वस्त आपल्या अधिकारात देणगी वा कर्जाऊ रक्कम उभी करुन डागडुगी, दुरुस्तीसाठी करतील.

२) देणगी रुपाने जी गोळा केलेली व कर्जाऊ घेतलेली रक्कम विश्वस्तांनी ज्या उद्देशाने घेतलेली असेल त्याच उद्देशासाठी खर्च केली पाहिजे.

३) विश्वस्तांचे लेखी पूर्व परवानगी शिवाय इतरांस कोणत्याही तऱ्हेची देणगी, वर्गणी गोळा करण्याचा अधिकार नसेल. असे केल्यास संबंधीत व्यक्ती गुन्ह्यास पात्र राहिल.

**२०) नवीन बांधकाम करणे :-**

१) न्यासाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने नवीन बांधकाम करावयाचे असल्यास खर्चाचा, बांधकाम आराखडा याबाबत विश्वस्त मंडळाची मंजुरी घेईल. बांधकाम तातडीने व आवश्यक असल्यास विश्वस्त मंडळ स्वतःचे जबाबदारीवर बांधकाम करेल. त्या कामात विश्वस्त मंडळाची मंजुरी घेईल. उपलब्ध बांधकाम निधी कमी पडल्यास देणगी रुपाने, कर्ज उभारुन बांधकाम करेल. घेतलेले कर्ज न्यासाचे उत्पन्नातुन वसूल केले जाईल. त्याची मर्यादा १० वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

Ajita Sharma



Scanned with CamScanner

२) नवीन बांधकाम करताना निविदा मागविल्या जातील. परंतु त्या स्वीकारणे किंवा सर्वच्या सर्व नाकारण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास असले. न्यासाच्या स्थावर व जंगम मालमत्तेची समर्थपणे, योग्य प्रकारे पत्र, प्रतिनिधी, ठेकेदार, कंत्राटदार, सहाय्यक किंवा त्यांची समिती नेमतील. त्यांची नेमतील. त्यांना न्यासाचे कामात गुंतविणेत वचनबद्ध करतील. कार्यक्रम सोपविले असताना त्यावर पर्यवेक्षीय नियंत्रण व देखरेख ठेवतील.

**२१. सेवक वर्ग :**

विश्वस्त मंडळ न्यासाचे सुरळीत कारभारासाठी मॅनेजर, क्लार्क इतर वर्ग योग्य त्या अटी व तरतुदी नमुद करुन सेवक वर्गाची नेमणूक करतील. असे नेमलेले सेवक वर्ग कमी करण्याचा त्यांना काढुन टाकण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास असेल. प्रत्येक वर्ग याचे पदानुसार दिलेली त्यांची कामे करतील.

**२२. परिपत्रके :-**

एखदी आवश्यक व तातडीची आवश्यक असेल तर विश्वस्त मंडळाचे सभेमध्ये निर्णय घेता येईल. असे परिपत्रक विश्वस्तांचे संमतीने काढता येईल. परिपत्रकामध्ये विश्वस्तांच्या विचारात मतभेद असल्यास विश्वस्त मंडळाच्या होणाऱ्या पुढील सभेमध्ये परिपत्रकाबाबत विषय ठेवण्यात येईल.

**२३ नियम अथवा पोटनियम करण्याचा अधिकार :-**

या विश्वस्त व्यवस्था पत्रातील तरतुदीनुसार न्यासाचे प्रशासनासाठी विश्वस्तांना योग्य वाटतील असे नियम व पोटनियम तयार करण्याची व ते नियम अंमलात आणण्याचा अधिकार विश्वस्तांना असेल. परंतु असे नियम व पोटनियम ह्या विश्वस्तपत्रातील तरतुदींशी विसंगत राहणार नाही. तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदींशी देखील विसंगत असणार नाही.

Ajita Sharma



Scanned with CamScanner

या विश्वस्त व्यवस्था पत्राला अनुसरुन निर्माण करण्यात आलेल्या उक्त न्यासाच्या सर्व कारभार मराठी भाषेतुन करण्यात येईल. परंतु योग्य ठिकाणी गरज भासल्यास राष्ट्रभाषा हिंदी, मराठी आणि इंग्रजीचा सुद्धा आधार घेण्यास विश्वस्त मुक्त असतील.

यांच्या उपस्थितीत सही मोहोरबंद व स्वाधीन केलेले आहे.

| क्र. | नाव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १ | श्री. पंकज कैलास शर्मा | अध्यक्ष | Pankaj |
| २ | श्री. संतोष जगत शर्मा | उपाध्यक्ष | Santosh Sharma |
| ३ | श्री. भारत रतीलाल ठक्कर | सचिव | Bharat |
| ४ | सौ. अजिता पंकज शर्मा | खजिनदार | Ajita Sharma |

यांच्या उपस्थितीत सही मोहोरबंद व स्वाधीन केलेले आहे. न्यास निर्मात्याकडून वर नमूद केलेल्या तारखेला रोख रु. १०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) आम्हाला मिळाले असे आम्ही घोषित करत आहोत.

| क्र. | नाव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १ | श्री. पंकज कैलास शर्मा | अध्यक्ष | Pankaj |
| २ | श्री. संतोष जगत शर्मा | उपाध्यक्ष | Santosh Sharma |
| ३ | श्री. भारत रतीलाल ठक्कर | सचिव | Bharat |
| ४ | सौ. अजिता पंकज शर्मा | खजिनदार | Ajita Sharma |

**साक्षीदार :-**

| अ. क्र. | नाव | सही |
|---|---|---|
| १) | Prashant Gaikwad | Prashant |
| २) | Sameer Bhoir | [signature] |

ठिकाण : Thane

दिनांक : 16/5/13



Scanned with CamScanner